# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९/११९०
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्र. आरक्षण/२२/९७ दिनांक – १/२/२०१२

प्रति,
मा. प्राचार्य / मा.संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – अपंग अधिकारी/कर्मचा–यांचा अनारक्षित पदांवर पदोन्नतीसाठी विचार करण्याबाबत.
संदर्भ – शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही २०११/प्र.क्र.२९८/१२, दि. १७/१०/२०११

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शासनाने गट अ, ब, क व ड संवर्गात सरळसेवेने पदे भरताना तसेच पदोन्नतीने नियुक्ती करताना ३ टक्के आरक्षण विहित केलेले आहे. गट 'अ' व 'ब' ची जी पदे अपंगांच्या विशिष्ट प्रवर्गासाठी निश्चित (identify) करण्यात आली आहेत त्या पदांवर पदोन्नती देताना निम्न संवर्गात अपंगांच्या संबंधित प्रवर्गातील व्यक्ती कार्यरत असल्यास पदोन्नतीकरीता अन्य व्यक्तींसाठी लावलेले निकष या अपंग व्यक्तींना लावून पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा असे उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये कळविलेले आहे.

तरी शासनाने निर्गमीत केलेल्या शासन आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

1/2/2012
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दि. - 24/10/11 आवक क्र. - 2627
विभाग -

कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 3273
दिनांक - 24/10/11
जावक दिनांक- 24/10/11
विभाग - Admin
Reservation Cell.

अपंग अधिकारी / कर्मचाऱ्यांचा अनारक्षित पदांवर पदोन्नतीसाठी विचार करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२९८/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७.१०.२०११

वाचा : केंद्र शासनाच्या कार्मिक, लोकशिकायत व निवृत्तीवेतने मंत्रालयाचे (Ministry of Personnel, Public Grivevence's and Pensions) कार्यालयीन ज्ञापन क्र.३६०३५/४/२०१०-इएसटीटी (आरइएस), दि.१.८.२०११.

## परिपत्रक

शासन सेवेत गट 'अ', गट 'ब', गट 'क' व गट 'ड' पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी अपंगांना ३% आरक्षण विहित केले आहे. तसेच सरळसेवेने नियुक्तीसाठीचे प्रमाण ७५% पेक्षा कमी आहे अशा गट 'क' व गट 'ड' मधील पदांवर पदोन्नतीने नियुक्तीसाठी अपंगांना ३% आरक्षण विहित केले आहे. सदर ३ % आरक्षणांतर्गत अपंगांच्या विविध प्रवर्गासाठी पदे निश्चित करण्याबाबत (identify) आदेश दिले आहेत. यानुसार अपंगांसाठीची राखीव पदे विविध प्रवर्गासाठी निश्चित करण्याबाबत प्रशासकीय विभागांकडून कार्यवाही करण्यात येते.

२. गट 'अ', गट 'ब' मधील पदांवर पदोन्नतीसाठी अपंगांना आरक्षण नाही या कारणास्तव, गट 'अ', गट 'ब' पदांवर पदोन्नतीसाठी अपंग व्यक्तींचा विचार होत नसल्याचे निदर्शनास आल्याने, केंद्र शासनाने, "गट 'अ' व गट 'ब' ची जी पदे अपंगांच्या विशिष्ट प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आली आहेत, त्या पदांवर पदोन्नती देताना, निम्न संवर्गात (feeder cadre मध्ये) अपंगांच्या संबंधित प्रवर्गातील व्यक्ती कार्यरत असल्यास, पदोन्नतीकरीता अन्य व्यक्तींसाठी लावलेले निकष त्यांनाही लावून त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा" असे निदेश संदर्भाधीन दि.१.८.२०११ च्या ज्ञापनान्वये दिले आहेत.

३. राज्य शासकीय पदांवर पदोन्नतीसाठी यथास्थिती "ज्येष्ठता अधीन पात्रता", "ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता" हा निकष विहित केला आहे. गट 'अ', गट 'ब' (राजपत्रित) पदांवर पदोन्नतीसाठी या निकषाच्या आधारे यथास्थिती विभागीय पदोन्नती समितीकडून / आस्थापना मंडळाकडून तपासणी होते. तथापि केंद्र शासनाच्या वरील आदेशातील सूचना राज्य शासनाने अंमलात आणण्याचे निदेश मा.उच्च न्यायालयाने "रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका" मधील अंतरीम सुनावणीत दिले आहेत. त्यानुसार केंद्र शासनाचे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. मा.उच्च न्यायालयाच्या निदेशास अनुसरुन, सर्व प्रशासकीय विभागांना व विभागप्रमुखांना याद्वारे कळविण्यात येते की, गट 'अ' व गट 'ब' ची जी पदे अपंगांच्या विशिष्ट प्रवर्गासाठी निश्चित (identify) करण्यात आली आहेत, त्या पदांवर पदोन्नती देताना, निम्न संवर्गात (feeder cadre मध्ये) अपंगांच्या संबंधित प्रवर्गातील व्यक्ती कार्यरत असल्यास, पदोन्नतीकरीता अन्य व्यक्तींसाठी लावलेले निकष, या अपंग व्यक्तींना लावून पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा. या

केंद्र शासनाने संदर्भाधीन ज्ञापनान्वये दिलेल्या निदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. आणि गट-अ व गट-ब पदावर पदोन्नतीमध्ये अपंगांना आरक्षण लागू नसले तरी अपंग व्यक्ती, पदोन्नतीकरीता लावलेले निकष पूर्ण करत असल्यास त्यांचा गट-अ व गट-ब पदावर पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०१८१०५४०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

के.पी.बक्षी
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
प्रधान सचिव, सा.वि.स., प्रधान सचिव (सा.न्या.व वि.स.विभाग), मंत्रालय, मुंबई- ३२.
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई.
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा)मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई, (२ प्रती प्रसिध्दीकरिता)
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,

*पत्राने.